प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. ०८.१०.२०२०**

**सिडको नळ जोडणी धारकांकरिता पाणी देयके**
**ऑनलाइनप्रमाणेच स्वीकृती केंद्रांमार्फत भरण्याची सुविधा**

नवी मुंबईतील सिडकोच्या नळ जोडणीधारकांच्या विनंतीनुसार आता ऑनलाइनप्रमाणेच देयक स्वीकृती केंद्रांमार्फत (बिल कलेक्शन सेंटर) पाणी देयक भरण्याची सुविधाही सिडकोतर्फे उपलब्ध करून देण्यात आली आहे. विविध नोडमधील पाणी देयक स्वीकृती केंद्रे सुरू करण्यात आली असून, या केंद्रांवर जाऊन ग्राहक आपले देयक रोख रक्कम, धनादेश (चेक), धनाकर्ष (डीमांड ड्राफ्ट) या स्वरूपात भरू शकतील. तसेच देयक भरल्याची पावतही सदर केंद्रांवर प्राप्त करून घेता येईल.

सिडकोच्या नळ जोडणीधारकांनी आपली देयके संबंधित नोडनुसार पुढे दिलेल्या केंद्रांवर भरावीत :- खारघर - सिडको कार्यालय, खारघर; कळंबोली/नावडे/तळोजा - सिडको कार्यालय, कळंबोली; कामोठे - पाणी पुरवठा कार्यालय, सेक्टर-६अ, कामोठे; पनवेल (पूर्व)/करंजाडे/काळुंद्रे - सिडको कार्यालय, पनवेल; पनवेल (पश्चिम) - सेक्टर-१२, पाण्याची टाकी, पनवेल; द्रोणागिरी - सिडको कार्यालय, द्रोणागिरी; उलवे - सिडको कार्यालय, उलवे; हेटवणे/सीबीडी सेक्टर-२१/२२ - रायगड भवन, सीबीडी.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क अधिकारी, सिडको**